# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

February 2020 Special Issue- 22 Vol. 5

## The Role of Women in Global Development



**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal, Dr. Aqueela Syed Gous**

29. प्रशासकीय सुधारणा व शास्त्रीय व्यवस्थापन चळवळ 79
प्रा.संजय अंकुशराव जगताप

30. 'सामाजिकरण व व्यक्तिमत्व' 81
प्रा.गोरे अशोक रामचंद्र

31. ग्रंथालयीन कामांसाठी आय.सी.टी.चे उपयोजन 83
प्रा.मोरे जयंत हंसराज , प्रा.किर्दंत विलास गोपीनाथराव

32. जलसंवर्धनः लोकसहभागाचे महत्व 85
प्रा.एन.एस.गेडाम

33. बीड जिल्ह्यातील परित्यक्ता स्त्रीयांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या 88
प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे

34. भारतीय कृषी क्षेत्रातील उत्पादन, उत्पादकता आणि उपलब्धता 92
प्रा.डॉ. चिताडे नंदकिशोर

35. सामाजिकरणाची भूमिका 95
प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव

36. 1857 च्या उठावात महिलांचा सहभाग 99
प्रा.डॉ. कदम एस.आर.

37. प्रशासकीय सुधारणा आणि व्यवस्थापन 102
प्रा.डॉ. तिडके के.डी.

38. सामाजिकशास्त्र - महिला आणि सामाजिक समस्या 105
श्री.नोळे बसनदास हिरा

39. २२ ते ४० वयोगट महिलांतील स्थुलता कमी करण्यासाठी वेगवेगळया उपचार पध्दतीचा वापर करून केलेला तुलनात्मक अभ्यास 110
प्रा. सिमादेवी एस. मुंडे , डॉ. प्रशांत बी. चव्हाण

40. 'सेवाक्षेत्र व आर्थिक विकास' 113
प्रा.डॉ.बेरळीकर प्रमोद बालाजीराव

41. खेळामध्ये भावनिक परिपक्वतेचे महत्व 117
डॉ. एम.एस.राठोड , सुरेश कोंडीबा राठोड

42. "महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शेतीची भूमिका" 119
प्रा. पवार एन.डी., प्रा. रामरूले डि.के.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22, Vol. 5 February 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# 'सेवाक्षेत्र व आर्थिक विकास'

**प्रा.डॉ.वरळीकर प्रमोद बालाजीराव**

सहयोगी प्राध्यापक व अर्थषास्त्र विभागप्रमुखए व्यंकटेष महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :—**

अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने शेती, उद्योग व सेवाक्षेत्र समाविष्ट होतात. या क्षेत्राचा विकास एकमेकावर अवलंबून असतो. सेवाक्षेत्राचा विकास झाला तर शेती व उद्योग क्षेत्राच्या विकासाला चालना मिळते. सेवाक्षेत्र जेवढे प्रगत तेवढा विकासाचा वेग जास्त किंवा अधिक असतो. विकसित राष्ट्रात सेवा क्षेत्राची स्थिती प्रगत प्रगत आणि उच्च दर्जाचा आहे. सेवा क्षेत्रात प्रामुख्याने सर्व प्रकारच्या आधारभूत संरचनेचा समावेश होतो. त्यात वाहतूक, दळणवळण, बँकींग, वीज यांचा समावेश होतो. प्रस्तूत शोधनिबंधात भारतातील प्रमुख सेवांचा आढावा घेतला आहे.

भारतातील सेवाक्षेत्राच्या व्याप्तीचा अभ्यास केला तर व्यावसायिक सेवा, वाहतूक विषयक, दळणवळण विषयक सेवा, वितरण विषयक सेवा, बांधकाम व स्थापत्य विषयक सेवा, शिक्षण, आरोग्य, वित, पर्यटन, प्रवास, सांस्कृतिक, मनोरंजन, पर्यावरण सेवा समाविष्ट होतात. भारतात सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढत आहेत. सन १९५०–५१ मधील एकुण ढोबळ उत्पन्नातील हिस्यापैकी ३३.३ टक्के सेवा क्षेत्राचा होतात तो वाढत जावून सन २०१२–१३ च्या आकडेवारीनुसार तो ५६.५ टक्के इतका झाला आहे. याचा अर्थ सेवा क्षेत्राचा भारतात झपाट्याने विस्तार व विकास होत आहे.

**शोधनिबंधाची उद्‌दिष्टे :—**

'सेवा क्षेत्र व आर्थिक विकास' या शोधनिबंधाची उद्‌दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. भारतातील प्रमुख सेवा सद्य:स्थितीतील विकासाचा अभ्यास करणे.
२. भारतातील सेवा क्षेत्रात कोणत्या नवीन घडामोडी घडत आल्या आहेत याचा अभ्यास करणे.
३. भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा किती वाटा आहे त्याचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके :—**

'सेवा क्षेत्र व आर्थिक विकास' या शोधनिबंधाची गृहितके पुढील प्रमाणे आहेत.

१. भारतात सेवाक्षेत्राचा विकास होत आहे.
२. भारतातील प्रमुख सेवा क्षेत्रात अनेक नवनवीन योजना येत आहेत.
३. भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे.

**संशोधन पध्दती व संशोधनाची साधने :—**

'सेवा क्षेत्र व आर्थिक विकास' हा शोधनिबंध लिहिण्यासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे. तसेच माहिती गोळा करण्यासाठी द्वितीयक साधनसामुग्रीचा वापर केला आहे किंवा आधार घेतला आहे. संदर्भग्रंथ, पुस्तके, त्रैमासिके, योजना, अर्थसंवाद आकडेवारीसाठी सरकारचे विविध सरकारी अहवाल याचा आधार घेवून या शोधनिबंध लिहिला आहे.

**विषय विश्लेषण :—**

१. उच्चशिक्षण :—

क्यू.एस. जागतिक विद्यापीठ कमवारीच्या अगदी अलीकडील सर्वेक्षणानुसार जागतिक विद्यापीठ कमवारीच्या अगदी अलीकडील सर्वेक्षणानुसार जगातील प्रमुख दोनशे विद्यापीठाच्या यादीत भारतातल्या तीन विद्यापीठांना स्थान मिळालेले आहे. यात प्रामुख्याने आयआयटी बॉम्बे, आयआयटी दिल्ली व भारतीय विज्ञान संस्था बंगळूरचा अंतर्भाव होतो. सन २०१८ च्या आकडेवारीनुसार खालील तालिकेत भारतीय सर्वोत्कृष्ट विद्यापीठे व कमवारी दर्शविलेली आहे.

तक्ता कमांक १.१

भारतातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठे व कमवारी

| अ.क. | विद्यापीठ | रॅंक कम |
|---|---|---|
| १. | आयआयटी दिल्ली | १७२ |
| २. | आयआयटी बॉम्बे | १७९ |
| ३. | आयआयएससी बंगरूळू | १९० |
| ४. | आयआयटी मद्रास | २६४ |

| | | |
|---|---|---|
| ५. | आयआयटी कानपूर | २९३ |
| ६. | आयआयटी खरगपूर | ३०८ |
| ७. | आयआयटी रूरकी | ४३१–४४० |
| ८. | दिल्ली | ४८१–४९० |
| ९. | आयआयटी गुवाहाटी | ५०१–५५० |
| १०. | जाधवपूर विद्यापीठ | ६०१–६५० |

संदर्भ :– बुलेटिन ऑफ युनिक अॅकडमी जुलै २०१७

वरील तक्ता कमांक १.१ भारतातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठाच्या यादीत पहिल्या जगातल्या दोनशे विद्यापीठाच्या यादीत भारतातील केवळ तीन विद्यापीठे समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील विद्यापीठाचा विचार केला तर मुंबई विद्यापीठ व पुणे विद्यापीठ ८०१–१००० या गटात आहे. आर्थिक विकासाच्या प्रकियेत सेवा क्षेत्रातील एक महत्वाची सेवा म्हणजे उच्चशिक्षण आहे. तिचा भारतात विकास होणे व उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढणे महत्वाचे आहे.

२. आरोग्य :–

शिक्षणाच्या सेवेइतकीच महत्वाची सेवा म्हणजे आरोग्य ही होय. किंबहूना मानव विकास निर्देशांकामध्ये शिक्षणाबरोबरच आरोग्याला महत्व आहे. एच क्यू निर्देशांक कमवारीत भारत जगातल्या १५४ व्या स्थानी आहे. जगातील १९५ देशाची यादी प्रसिध्द केली. यात आरोग्य सेवांची पोहच व दर्जा या संदर्भात भारत जगात १५४ व्या स्थानी तर नवजात बालकांच्या स्थिती संदर्भात भारत जगात १८५ व्या स्थानी आहे. किडनीचे विकारासंदर्भात भारत जगात १७६ व्या कमांकावर आहे. क्षयरोगाच्या संदर्भात भारत जगात १६६ व्या कमांकावर तर मधुमेहाच्या बाबतीत १५१ व्या कमांकावर आहे. भारताला आरोग्य सेवेच्या निर्देशांकानुसार १०० गुणांपैकी ४४.८ गुण मिळाले ते उपखंडात सर्वात कमी आहेत.

३. वाहतूक :–

कृषी विकास, उद्योग, सामाजिक जीवन, सृजनशीलता व एकात्मता निर्माण होण्यात रस्ते वाहतुकीचा विकास होणे गरजेचे आहे. रस्ते विकासाच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना प्रधानमंत्री भारत जोडो परियोजना, भारत निर्माण योजना, किमान गरजा कार्यकम व राष्ट्रीय महामार्ग व पायाभूत विकास महामंडळ मर्यादीत व भारताला योजनेच्या माध्यमातून रस्ते विकासाच्या योजना राबविल्या जातात. भारतातील रस्त्यांचे जाळे (अमेरिकेनंतर) सर्वात मोठे दुसऱ्या कमांकावर जाळे आहे.

४. बॅक व वित्त संस्था :–

शिक्षण आरोग्य वाहतूक इतकीच महत्वाची सेवा म्हणजे बॅक व वित्त संस्थांची आहे. मानवी शरिरात रक्तवाहिन्यांचे जे काम आहे ते काम आर्थिक विकासाच्या प्रकियेत बॅका व वित्त संस्थांचे आहे. भारतीय बॅकींग क्षेत्रात व्यापारी बॅका व सहकारी बॅका अस्तित्वात असून त्या सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात सुध्दा कार्यरत आहेत. तर भांडवली बाजारात आय.डी.बी.आय., आय.सी.आय.सी.आय तर गुंतवणूक संस्था म्हणून एल.आय.सी., यु.डी.आय.ची भूमिका महत्वाची आहे.

भारतातील सेवा क्षेत्राचा आढावा :–

१. विमान वाहतूक :–

सेवा क्षेत्रात विमान वाहतुकीची भूमिका महत्वाची आहे. आतंतरराष्ट्रीय बाजारपेठेत माल पोहचविण्यासाठी विमान वाहतुकीची भूमिका महत्वाची आहे. जागतिक हवाई क्षेत्रात भारताचा सध्या नववा कमांक आहे. भारताच २०२० पर्यंत तिसरा माल वाहतुकीचा सर्वात मोठा देश होण्याची शक्यता आहे. २०१६ मध्ये भारतामधील हवाई वाहतुकीमध्ये १०० टक्के परकीय गुंतवणूकीला परवानगी दिली आहे. भारतातील विमान वाहतूक कंपन्यांनी एअर जेट, एअर इंडिया, स्पेस जेट, एअर एशिया इंडिया, कंपन्या समाविष्ट आहेत. केंद्र सरकारने २७ एप्रिल २०१७ रोजी केंद्र सरकारच्या उडान योजनेअंतर्गत जाणारी हवाई वाहतूक मंत्रालयाने प्रादेशिक हवाई आणि विमान सेवेची घोषणा केलेली आहे.

२. भारतीय ऊर्जा :–

देशाच्या सर्वांगीण आणि आर्थिक विकासासाठी आवश्यक बाब म्हणजे ऊर्जा, ऊर्जा ज्यापासून मिळते त्यास ऊर्जा स्त्रोत असे म्हणतातत्र भारतात दि.३१ ऑक्टोबर २०१७ अखेरीस एकूण ३,३०,११० मेगावॅट ऊर्जानिर्मिती झाली. त्यापैकी औष्णिक विद्यूत निर्मिती (कोळसा) १,९३,४२६ मेगावॅट होती. मोठे जलविद्युत प्रकल्प ४४,७६५ मेगावॅट व लघु जलविद्युत ४,३८९ मेगावॅट व पवनउर्जा ३२,७०० मेगा वॅट होती. सौरउर्जा १४,७७१ मेगावॅट व अणुविद्युतऊर्जा ६,७८० मेगावॅट होती.

॰ भारतीय राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे

सन १९५१ पासून भारताने आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजनेचा स्वीकार केला. या योजना काळात भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील सेवा क्षेत्राची व्याप्ती बरोबरच स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा ही वाढत आहे १९९१ नंतर भारतात सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांचे परिणाम म्हणूनही सेवाक्षेत्राचा विस्तार वेगाने होत आहे. भारतात सेवा क्षेत्राचा विकास घडून आल्यामुळे सध्या परकीय गुंतवणूकीची सर्वक्षेत्रे भारतातील सेवा क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. सेवा क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्व दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे सरकारच्या महसूल व रोजगारात वाढ होत आहे.

तक्ता क. २.१

स्थूल देशांतर्गत उत्पादनातील क्षेत्रीय हिस्सा

| अ.क. | वर्ष | सेवा क्षेत्र |
|---|---|---|
| १. | १९५०—५१ | २९ |
| २. | १९६०—६१ | ३३.५ |
| ३. | १९७०—७१ | ३२.९ |
| ४. | १९८०—८१ | ३६.० |
| ५. | १९९०—९१ | ४१.६ |
| ६. | २०००—०१ | ५०.५ |
| ७. | २००२—०३ | ५१.५ |
| ८. | २००३—०४ | ५२.८ |
| ९. | २००४—०५ | ५३.० |
| १०. | २००५—०६ | ५३.८ |
| ११. | २००६—०७ | ५४.१ |
| १२. | २००७—०८ | ५५.७ |
| १३. | २००९—१० | ५६.९ |

संदर्भ :— इंडियन इकॉनॉमी, रूद्र दत्त

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते. सन १९९५१—५१ मध्ये सेवाक्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाटा २९ टक्के होता. त्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वाढत होत गेलेली दिसून येते सन २००९—१० च्या आकडेवारी नुसार यात वाढ होवून तो ५६.९ टक्के वर आलेला आहे.

भारतातील सेवा क्षेत्रात अनेक नवनवीन योजना येत आहेत :—

१. १९९० च्या दशकानंतर भारतात सेवा क्षेत्राचा वेगाने विकास घडून आलेला दिसून येतो.
२. व्यवसाय सेवा, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण सेवा, वित्तीय सेवा, सामुदायिक सेवा, व्यापार, हॉटेल्स उपहारगृह या सेवात १९९० नंतर वाढ झालेली दिसून येते.
३. १९९० नंतर भारतात टेलिफोन सेवामध्ये वाढ झालेली आहे त्यामुळे भारतातील सेवा क्षेत्रात वाढ झालेली दिसते.
४. भारतातील विमान वाहतूक क्षेत्रात खाजगीक्षेत्र आणि परकीय गुंतवणूक दिल्यामुळे भारतातील विमान सेवेचा विकास होत आहे. खाजगी क्षेत्रातील पहिले आंतरराष्ट्रीय विमानतळ कोचीन येथे उभारले जात आहे. भारतात आधीच अस्तित्वात असलेल्या विमानसेवांमध्ये १०० टक्के भेट परकीय गुंतवणूकीस परवानगी आहे. यापैकी ७४ टक्के स्वयंचलिलत मार्गाने होत आहे. तसेच भारतात ग्रीनफिल्ड विमानतळे उभारली जात आहेत. त्यामध्ये १०० टक्के थेट परकीय गुंतवणूक स्वयंचलीत मार्गाने करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

शोधनिबंधाचे निष्कर्ष :—

'सेवाक्षेत्र व आर्थिक विकास' या शोधनिबंधाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. भारतात सेवा क्षेत्राचा विकास होत आहे.
२. भारतातील प्रमुख सेवाक्षेत्रात अनेक नव—नवीन योजना येत आहेत.
३. भारतातील सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढत आहे.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 22, Vol. 5
February 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

संदर्भ ग्रंथ :–

१. रूद्र आणि दत्त, 'इंडियन इकॉनॉमी', चॉंद आणि कंपनी, रामनगर, नवी दिल्ली, ७२ आवृत्ती
२. देसाई आणि भालेराव, 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, शिवाजीनगर, पुणे १५ आवृत्ती
३. बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी, जुलै २०१७
४. सकाळ इयर बुक, सकाळ प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे जानेवारी २०१८
५. किरण देसले, अर्थशास्त्र स्पर्धा परीक्षा, दीपस्तंभ प्रकाशन, पाचवी आवृत्ती, जुलै २०१५